| 2 | | | | Suryakant Manohar Shelke & Others 5 | 108 Out of | 1 | 4.9100 | 0.1204 |
| 3 | | | | Rajesh Manohar Lod (Teacher) & Others 5 | 110 Out of | 1 | 1.2100 | 0.0058 |
| 4 | | | | Ramkrishna Harichandra Wagh & Others 5 | 111 Out of | 1 | 1.6400 | 0.0165 |
| 5 | | | | Kisan Sitaram Shinde & Others 1 | 112 Out of | 1 | 1.6200 | 0.0325 |
| 6 | | | | Mahadev Ramchandra Wagh | 113 Out of | 1 | 1.6400 | 0.0421 |
| 7 | | | | Natthu Narayan Bhinge & Other 1 | 114 Out of | 1 | 0.7700 | 0.0027 |
| 8 | | | | Savitrabai Ramchandra Thosare & Others 18 | 147 Out of | 1 | 1.2100 | 0.0057 |

| SR. NO | Land Acquisition Proposal Number | Village Name | Tehsil | Land Owners Name according to 7/12 | Survey No./Gatt No. | Land Holding Method | Area as per 7/12 Extracts (Ha) | Acqisition Area (Ha) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 04/2026-27 | Manarkhed | Balapur | Parvatabai V. Sampat Ingale & Others 5 | 149 Out of | 1 | 0.8100 | 0.0095 |
| 10 | | | | Vandana V. Mahaved Sonone & Others 2 | 150 Out of | 1 | 0.8100 | 0.0109 |
| 11 | | | | Suman Viajay Jagtap & Others 4 | 152 Out of | 1 | 0.8100 | 0.0200 |
| 12 | | | | Sudama Tukaram Bhosale & Others 6 | 153 Out of | 1 | 1.3500 | 0.0232 |
| 13 | | | | Nazim Khan Aurangzeb Khan | 155 Out of | 1 | 1.6200 | 0.0138 |
| 14 | | | | Kishor Dashrath Lod & Others 6 | 157 Out of | 1 | 1.3100 | 0.0398 |
| 15 | | | | Raghunath Amruta Thosare & Others 4 | 158 Out of | 1 | 1.100 | 0.0183 |
| 16 | | | | Asif Kha Jahur Mahamandkha | 159 Out of | 1 | 1.4400 | 0.0041 |
| 17 | | | | Yogesh Manikarao Lod | 368 Out of | 1 | 0.5400 | 0.0826 |
| 18 | | | | Prashant Arun Lod & Others 1 | 369 Out of | 1 | 2.2600 | 0.0154 |
| 19 | | | | Vinayak Ramratan Lod & Others 10 | 377 Out of | 1 | 1.9000 | 0.0270 |
| 20 | | | | Tulsabai Sarangandhar Indore | 378 Out of | 1 | 1.2100 | 0.0505 |
| 21 | | | | Manohar Shamrao Lod & Others 6 | 11 Out of | 1 | 20.5300 | 0.3901 |
| | | | | | | Total | 50.5200 (Ha) | 0/9576 (Ha) |
| 1 | 05/2026-27 | Onkarkhed | Balapur | Shilabai V. Aruna Lod & Others 7 | 11 Out of | 1 | 0.96.00 | 0.0006 |
| 2 | | | | Vishnaji Krishnaji Sushir & Others 1 | 13/1 Out of | 1 | 1.4600 | 0.0378 |
| 3 | | | | A Shakuntala Balkrishna Indore & Other 1 | 13/2 Out of | 1 | 1.5300 | |
| 4 | | | | Nagorao Baban Sushir & Others 1 | 13/3 Out of | 1 | 0/7200 | |
| 5 | | | | Nagorao Baban Sushir | 13/4 Out of | 1 | 1.7300 | |
| 6 | | | | Yamunabai Ananda Kanpure & Others 24 | 17/1 Out of | 1 | 4.2100 | 0.02777 |
| 7 | | | | Anil Jayaram Surushe & Others 5 | 17/3 Out of | 1 | 1.7700 | |
| | | | | | | Total | 12.3800 (Ha) | 0.3161 (Ha) |
| 1 | 06/2026-27 | Nimkarda | Balapur | Nirmala Ramkrishana Dange & Others 6 | 243 Out of | 1 | 2.2100 | 0.0343 |
| | | | | | | Total | 2.2100 (Ha) | 0.0343 (Ha) |
| 1 | 07/2026-27 | Paras | Balapur | Haribhau Shamrao Raundale & Others 2 | 1013 Out of | 1 | 1.3300 | 0.0067 |
| 2 | | | | Pandit Narayan Raundale & Others 1 | 1014 Out of | 1 | 1.0200 | 0.0087 |
| 3 | | | | Haribhau Rambhau Lande & Others 1 | 1015 Out of | 1 | 2.5000 | 0.0086 |
| 4 | | | | A. Rafiq A. Majid & Others 2 | 1172 Out of | 1 | 1.5600 | 0.1069 |
| 5 | | | | Bhimrao Prabhu Sonone | 1173 Out of | 1 | 0.5500 | 0.2820 |
| 6 | | | | Tayyar Ali Shaukat Ali & Others 1 | 1174 Out of | 1 | 1.0500 | 0.0579 |
| 7 | | | | Sk. Nisar Sk. Usman & Others 7 | 1175 Out of | 1 | 2.6300 | 0.0377 |
| 8 | | | | Rupesh Punjabrao Lande | 1182 Out of | 1 | 1.5300 | 0.0029 |

पुढील पानावर..

# तुकाराम मुंढे साहेब...

# औषध प्रशासनाचा मोरक्या, वसुलीसाठी घालतो गिरक्या !





## * एकही ठोस कारवाई नाही, फक्त वसुलीची घाई...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

तुकाराम मुंढे हे शिस्त, कडक, नियम व कायद्यासाठी प्रसिध्द आहेत. ज्या विभागात गेले त्या विभागात ते कायद्याने काम करून सर्वसामान्यांचा फायदा करतात मात्र, अकोला - वाशीम जिल्ह्यात त्यांच्या याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी कारवाईच्या नावाखाली छोट्या दुकानदारांकडून लूट सुरू केली आहे. यासाठी दलालही नेमले आहेत. अकोला - वाशीम जिल्ह्यात अन्न व प्रशासन विभागाने एकही ठोस मोठी कारवाई न करता निव्वळ वसुलीचाच धंदा सुरू केला आहे. महाराष्ट्रभर अन्न व औषध प्रशासन (इर्ऊे) विभागाकडून भेसळयुक्त अन्नपदार्थ, अवैध गुटखा विक्री आणि मेडिकलमधील अनियमिततेविरोधात तुकाराम मुंढे यांनी धडक मोहीम सुरू केली आहे. राज्यभरात कारवायाचा धडाका सुरू आहे. मात्र भ्रष्टाचाराने बरबटून पोखरून वाळवी लागलेल्या वाशीमच्या अन्न व प्रशासन विभागाच्या कारवाया कमी वसुलीच जास्त सुरू आहे. राज्यभरातील तुकाराम मुंढे यांच्या कारवायामुळे माफियांनी धास्ती घेतली असून अनेकांची मस्ती उतरली आहे. याच गोष्टीचा फायदा घेत औषध प्रशासन विभागाचा मोरक्या दलालामार्फत वसुलीसाठी बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात गिरक्या घालत आहे.








कडक शिस्त आणि प्रामाणिक कारभारासाठी ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांच्या नावामुळे जनतेमध्येही आता व्यवस्था बदलेल, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.मात्र, याच मोहिमेच्या आड काही ठिकाणी वेगळाच खेळ सुरू असल्याचे आरोप आता समोर येत आहेत. कारवाईच्या नावाखाली काही अधिकारी-कर्मचारी आपलीच खासगी वसुलीची 'व्यवस्था' मजबूत करत असल्याची चर्चा रंगत आहे. मुंढे साहेबांच्या कडक प्रतिमेचा आधार घेऊन जर कुणी स्वतःचे आर्थिक गणित जुळवत असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.तपासणीपूर्वीच माहिती पोहोचते का? काही ठिकाणी कारवाई फक्त कागदावरच होते का? भेसळ करणारे आणि नियम मोडणारे लोक वारंवार वाचतात कसे? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.अन्नपदार्थांच्या तपासणीपासून गुटखा विक्रीपर्यंत जर यंत्रणेतील काही घटक आणि अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये संगनमत असेल, तर हा थेट जनतेच्या आरोग्याशी खेळ आहे. कारण भेसळयुक्त अन्नाचा फटका सामान्य नागरिकांना बसतो, तर गैरप्रकार करणारे मात्र मोकाट फिरतात.गुटखा विक्रीवर कारवाईचे आदेश निघतात, धाडींची चर्चा होते; पण काही ठिकाणी कारवाईपूर्वीच हालचाली थांबतात, अशी चर्चा का होते? याचे उत्तर प्रशासनाने शोधण्याची वेळ आली आहे.मोठमोठ्या घोषणा, धडक मोहिमा आणि प्रसिद्धीपेक्षा आता गरज आहे ती प्रत्यक्ष परिणामांची. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर अशा मोहिमा फक्त कागदावरच राहतील.मुंढे साहेब, तुमच्या नावावर जर कुणी यंत्रणेचा गैरफायदा घेत असेल, तर त्या प्रवृत्तीला आळा घालणे आवश्यक आहे. प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या प्रतिमेचा वापर करून जर भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असेल, तर ही संपूर्ण व्यवस्थेची हार ठरेल. अकोला- वाशीम बुलढाणा जिल्ह्यातील भ्रष्ट अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याऐवजी तुकाराम मुंढे यांच्या नावावर मोठ्या माफियांना सोडून छोट्या दुकानदाराकडून व मेडीकल वाल्यांकडून दलालामार्फत थेट वसुली सूरू केली आहे. हे दलाल खासगी असून यांचे अधिकाऱ्यांची थेट संबंध आहेत.

त्यामुळे तुकाराम मुंढे यांच्या नावाचा गैरवापर करून भ्रष्टाचार करणाऱ्या अशा भ्रष्टअधिकाऱ्यांवरही कारवाई करावी त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी त्यांच्या कामाचा मागील लेखाजोखा तपासावा त्यामुळे सत्य समोर येवून भ्रष्टअधिकारी उघडे पडतील. व छोट्या दुकानदारांना त्रास होणार नाही.

### भ्रष्टअधिकाऱ्यावर कारवाई करा - गोविंद वर्मा

**आतापर्यंत जिल्ह्यात एकही ठोस कारवाई न करता थेट दरमहा वसुली करणाऱ्या भ्रष्टअधिकाऱ्यावर विभागीय चौकशी लावून त्यांच्या मालमत्तेचीही चौकशी करावी त्याच्यावर निलंबनाची कारवाईही करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे शहराध्यक्ष गोविंद वर्मा यांनी निवेदनाद्वारे मंत्री झरवाळ व तुकाराम मुंढे यांच्याकडे केली आहे.**

## थोडक्यात

### कृषी सप्ताहनिमित्त घोटा जि.प.शाळेत वृक्षारोपण !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

हरित क्रांतीचे प्रणेते व माजी. मुख्यमंत्री डॉ. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने घोटा येथील संगमेश्वर शेतकरी गटाद्वारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे दि.०१ ते ०७ जुलै २०२६ या कालावधीत कृषी सप्ताहनिमित्त जिल्हा परिषद शाळेत व संगमेश्वर शेतकरी गटाच्या वतीने यांच्याकडून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शेतकरी उत्पादन गटाचे निमंत्रक किशोर मोरे यावेळी उपस्थित सरपंच अनिल मोरे, सुनील मोरे, गजानन मोरे, सुनील लोखंडे, आदित्य मोरे,किशोर मोरे, दिपक मापारी, बळीराम मोरे, संदीप अवचार, विजय मोरे, निलेश गोडघासे, किसन शेंडगे,यांनी विशेष परिश्रम घेतले.

### झोलेबाबा विद्यालयात प्रवेशोत्सव



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, पिंप्री (अवगण) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी मागील वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव तथा प्राचार्य मा. श्री. सुनिलजी सपकाळ साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमित उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त, नैतिक मूल्ये आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणाबरोबरच विविध शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.या प्रवेशोत्सवामुळे नवागत विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साह, आनंद आणि प्रेरणादायी वातावरणात झाली.

# अहवाल गेला वरिष्ठांकडे... कारवाई मात्र अजूनही कागदावर !

## केनवडमधील जैविक कचरा प्रकरणात उपकेंद्राचा अहवाल; कारवाई कधी, नागरिकांचा सवाल

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

केनवड येथील एका खासगी दवाखान्याकडून घातक जैविक वैद्यकीय कचरा उघड्यावर टाकला जात असल्याची माहिती स्थानिक ग्रामीण आरोग्य उपकेंद्राने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवालाद्वारे पोहोचविल्याचे समोर आले आहे. मात्र अहवाल पाठविल्यानंतरही या प्रकरणात कोणती ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याने आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे 'अहवाल असूनही कारवाई का नाही?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, इंजेक्शनच्या सुया, सिरिंज, काचेच्या औषधांच्या शिश्या व इतर जैविक कचरा उघड्यावर आढळल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे हा परिसर राष्ट्रीय महामार्गालगत असून बँका, सेतू केंद्र, एसटी बसथांबा आणि ग्रामीण आरोग्य उपकेंद्राजवळ असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते.या प्रकरणाची माहिती संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली असल्याचे सांगितले जात असतानाही नियमभंगाची चौकशी, नोटीस किंवा दंडात्मक कारवाईबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे 'अहवालानंतरही कारवाई का झाली नाही?' हा प्रश्न अधिक तीव्र झाला असून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.जैविक वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावणे कायद्याने बंधनकारक आहे. अशा कचऱ्याची उघड्यावर विल्हेवाट लावल्याचा आरोप होत असताना आणि त्याबाबत वरिष्ठांना अहवालही सादर झाल्याचे सांगितले जात असताना,






त्यानंतरही कारवाई न झाल्याने आरोग्य विभागाच्या देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर करावी, नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर तातडीने नियमानुसार कठोर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# जिल्ह्यातील १० लाख २० हजार २०८ मतदारांची घराघरांत जाऊन पडताळणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला वाशिम जिल्ह्यात प्रत्यक्ष प्रारंभ झाला असून, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी स्वतः गणनापत्र (एन्युमरेशन फॉर्म) भरून या मोहिमेची सुरुवात केली. यावेळी त्यांनी नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना अचूक व संपूर्ण माहिती देऊन या लोकशाही प्रक्रियेला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

जिल्ह्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येत असून, सुमारे १० लाख २० हजार २०८ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष घराघरांत जाऊन पडताळणी केली जाणार आहे. यासाठी १,१०० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), १०३ बीएलओ पर्यवेक्षक, तीन मतदार नोंदणी अधिकारी आणि ४२ सहायक मतदार



नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले की, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नागरिकांच्या घरी भेट देऊन अंशतः भरलेले गणनापत्र दोन प्रतींमध्ये उपलब्ध करून देतील. नागरिकांनी त्यामधील माहितीची काळजीपूर्वक पडताळणी करून आवश्यक दुरुस्त्या कराव्यात, दोन्ही प्रतींवर स्वाक्षरी करून अद्ययावत छायाचित्रासह संबंधित बीएलओकडे जमा कराव्यात. हा फॉर्म अतिशय सोपा असून अल्पावधीत भरता येतो. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा. यावेळी सहायक मतदान नोंदणी अधिकारी निलेश पळसकर व अभिजित देवगीरकर, पर्यवेक्षक सुभाष जवंजाळ, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी सुधीरकुमार डवले, तंत्रज्ञ अजय बांडे आदी उपस्थित होते.

चाकातीर्थ प्रकल्पग्रस्त लाभधारकांसाठी...

# ३ कोटी रुपयांचा सानुग्रह निधी मंजूर !

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचे शेतकऱ्यांकडून आभार
*मालेगाव भाजपा तालुकाध्यक्ष सुरेश मुंढे यांच्या पाठपुराव्याला यश

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

चाकातीर्थ प्रकल्पाअंतर्गत सन २००६ ते २०१३ या कालावधीत झालेल्या सरळ खरेदीतील प्रकल्पग्रस्त लाभधारकांसाठी राज्य शासनाने २ कोटी ९५ लाख ७० हजार रुपयांचा सानुग्रह निधी मंजूर केला आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकरी व प्रकल्पग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.


**सानुग्रह मंजूर करण्यात आलेल्या निधीमध्ये –**

*मौजे जऊळका रेल्वे येथील लाभधारकांसाठी – १ कोटी २२ लाख रुपये *जामखेड येथील लाभधारकांसाठी – ५० लाख १० हजार रुपये *डव्हा येथील लाभधारकांसाठी – ८७ लाख २० हजार रुपये *खिर्डा येथील लाभधारकांसाठी – १ कोटी ३६ लाख ४० हजार रुपये

**आतापर्यंत एकूण: ३ कोटी ९५ लाख ७० हजार रुपये सानुग्रह निधी मंजूर झाला**

यापैकी १ करोड रुपये लाभधारकांना यापूर्वी देण्यात आले उर्वरीत राहिलेले

२ कोटी ९५ लाख ७० हजार रुपयांचा सानुग्रह निधी शासनाने २४ जून रोजी मंजूर केला आहे.या प्रश्नाला निकाली काढण्यासाठी मालेगाव भाजपा तालुकाध्यक्ष श्री सुरेश मुंढे यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, या निर्णयामुळे परिसरातील शेतकरी व प्रकल्पग्रस्तांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.लाभधारकांना न्याय देण्यासाठी संवेदनशील भूमिका घेतल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री श्री गिरीश महाजन व खासदार अनुपभाऊ धोत्रे यांचे तसेच या विषयासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे भाजपा तालुकाध्यक्ष श्री सुरेश मुंढे यांचे सर्व शेतकरी बांधवांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत.



## रमेश मुंजे यांनी केले शालेय साहित्याचे वाटप

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर येथील कलंदरी उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी माजी नगरसेवक सय्यद आजम यांची नात माहीम फलक हिने दोन वर्षांपूर्वी दैनिक सिटी न्यूज सुपर फास्ट नी चित्र रंगवा स्पर्धा आयोजित केली होती त्या स्पर्धेमध्ये भाग घेऊन चित्राचे एकूण संग्रह तयार करून सहभाग नोंदविला होता व सिटी न्यूज अकोला कार्यालयाला पाठविण्यात आले होत. माहीम फलक हिने माझे बक्षीस आले त्यामुळे यावर्षीही सिटी न्युज सुपरफास्टचे तालुका प्रतिनिधी रमेश मुंजे यांनी शालेय साहित्य वाटप करून सन्मान केला.मागील वर्षाच्या बक्षीसाची आठवण काढल्यामुळे कुमारी माहीम फलकला सिटी न्युज चे प्रतिनिधी रमेश मुंजे यांनी सिटी न्यूज परिवारा मार्फत देण्यात येणारे बक्षीस म्हणून तिला सहा नोटबुक्स देऊन तिचा सन्मान यांनी केला.



## जाहीर नोटीस

प्रो.नं. १५५५/२०२६ दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर दि. २९/०६/२०२६

**वि. दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

**किरकोळ अर्ज क. २६१/२०२६** **ने.ता. ३१/०७/२०२६**

**अर्जदार: १) विजया नरेंद्र गावंडे,** वय ६७ वर्ष, धंदा घरकाम
**२) ऋषिकेश नरेंद्र गावंडे,** वय ४५ वर्ष, धंदा नोकरी
अ.क्र. १ व २ रा कळाशी, ता. दर्यापूर, जि. अमरावती
**३) सुशिल नरेंद्र गावंडे,** वय ४४ वर्ष, धंदा घरकाम
रा. जी-४०४. ग्रिन झोन ५७.५८ बानेर बिटवाईज टॉवर
पुणे, ता. जि. पुणे

- विरूद्ध -

**गैरअर्जदार:**

**निरंक**

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **नरेंद्रकुमार विश्वासराव गावंडे** हे दिनांक ०९/०२/२०१० रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि २९/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर**

**प्रपत्र- १**
**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

**पत्ता: कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,**
**पाटबंधारे वसाहत, एम.एस.ई.बी. पावर हाऊससमोर**
**गौरक्षण रोड, अकोला.-४४४००४**

**ई- मेल पत्ता: vidharbhahydrodiva@gmail.com** **दूरध्वनी क्रमांक: (०७२४)२४५७९८३**

**ई- निविदा सूचना क्र. ०५ सन-२०२६-२०२७.**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्यावतीने कार्यकारी अभियंता विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग अकोला, हे अनुभवी सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता **ब-१** नमुन्यातील ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | जिल्हा | कामाची अंदाजित किंमत | इसारा रक्कम | कोऱ्या निविदा दस्तावेजाची किंमत (नापरतावा) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिगाव प्रकल्प वसाहत शेगाव येथील रहिवाशी व कार्यालयीन इमारतीच्या बांधकामामध्ये येणारी ३३ केव्ही उच्च दाब वीज वाहिनी स्थांनांतरित करण्याचे काम. | बुलढाणा | ५३९१५२०/- | ५३९१६/- | २३६०/- | ६ महिने |
| २ | घुंगशी उपसा सिंचन योजना ता. मुर्तिजापूर जि. अकोला येथील ३३/६.६ के.व्ही. विद्युत उपकेंद्र व त्यास निगडीत विद्युत वाहिनीचे द्विवार्षिक परिचन व संचलन. | अकोला | २७६४५९३/- | २७६४६/- | २३६०/- | २४ महिने |

ई- निविदा उपलब्ध कालावधा :- दिनांक ०३.०७.२०२६(११.०० वाजता) ते दिनांक १०.०७.२०२६. (१७.०० वाजता)

ई- निविदा उघडणे :- दिनांक १३.०७.२०२६ (११.०० वाजता)

अ) परिशिष्ट क ५०० /- रू. च्या स्टॅम्प पेपरवर भरून देणे आवश्यक आहे.

ब) निधि उपलब्धतेनुसार कामाची देयके अदा केली जातील.

खालील ठिकाणी ई- निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ https://mahatenders.gov.in - (सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला कार्यालयातील सूचना फलक.

**(अ. गो. दडमल)**
कार्यकारी अभियंता
विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, अकोला

वि.मा.का/अम./जाहि./२९०/२०२६-२०२७

# अकोला मनपाचा कचरा संकलन कंत्राट रद्द; पुन्हा निविदा प्रक्रिया सुरु

प्रतिनिधी दि. 2 जूलै

**अकोला:** शहरातील कचरा गोळा करण्याच्या कंत्राटदार नियुक्ती प्रक्रियेत होत असलेल्या कथित गैरप्रकारांबाबत 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने ९ जून आणि २१ जून रोजी सातत्याने सडेतोड वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची प्रशासनाला अखेर दखल घ्यावी लागली असून, अकोला महानगरपालिकेने आधीची वादग्रस्त निविदा प्रक्रिया रद्द केली आहे. आता ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पुन्हा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पण,पुन्हा एकदा नागपूरच्या कंत्राटदारालाच ठेका मिळावा यासाठी तर प्रयत्न होणार नाही ना अशी विचारणा होत आहे.

आधीच्या निविदेतील जाचक अटींमुळे अनेक नामांकित कंपन्यांना यात सहभागी होता आले नाही. केवळ दोनच कंत्राटदार पुढे आल्याने मनपाने ही प्रक्रिया रद्द केली आहे. निविदेतील अटीनुसार २०० ते २५० मेट्रिक टन कचरा उपलब्ध झाला नाही, तर संबंधित कंपनीला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागणार होते. प्रत्यक्षात शहरातून दररोज अवघा १५० ते १६० टन कचरा निघत असल्याने मोठ्या कंपन्यांनी या प्रक्रियेतून माघार घेतली होती. मनपा विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसेन यांनी आरोप केला होता की, नागपूरच्या एका ठराविक कंत्राटदाराला फायदा पोहोचवण्यासाठीच सत्ताधारी आणि प्रशासनाने संगनमताने या अटी तयार केल्या होत्या. स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, निविदा प्रक्रियेत केवळ दोनच निविदा आल्यामुळे आता संपूर्ण प्रक्रिया रद्द करून ती सर्वांसाठी खुली आणि पारदर्शक पद्धतीने पुन्हा राबविली जात आहे, जेणेकरून शहराचा कचरा योग्य



**आर आर सी न्यूज व सिटी न्यूज सुपरफास्ट चा दणका**
'सिटी न्यूज सुपरफास्ट'ने ९ आणि २१ जून रोजी जनतेच्या पैशांची होणारी उधळपट्टी आणि कंत्राटातील अटींमधील त्रुटी चव्हाट्यावर आणल्या होत्या. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून अकोलेकरांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या आपल्या आर आर सी वृत्तवाहिनीच्या मोहिमेला आलेले हे मोठे यश आहे.


महापालिकेचा कोट्यवधींचा कचरा गेमप्लॅन!
पैसा जनतेच्या कराचा, कचऱ्यातून समृद्धी कोणाची ?
'पडीक वॉर्ड' संकल्पनेचा पुरता बोजवारा!
महापालिकेची यंत्र सामग्री दान करणार का

आयुक्तांच्या बंगल्यावर बड्या ठेकेदारांची धावाधाव

प्रतिनिधी २१ जून

अकोला : अकोला महानगरपालिकेत सध्या कचरा संकलनाच्या कोट्यवधींच्या ठेक्यावरून प्रचंड 'लपवाछपवी' सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. एकीकडे शहरात कचऱ्याची कोंडी निर्माण झाली असताना, दुसरीकडे मात्र नागपूरच्या एका 'लाडक्या' कंत्राटदाराला ठेका मिळवून देण्यासाठी मनपाच्या काही बड्या अधिकाऱ्यांनी रात्रीचा दिवस केला आहे. विशेष म्हणजे, आयुक्त सध्या सुट्टीवर असतानाही त्यांच्या शासकीय बंगल्यावर अधिकारी आणि कंत्राटदारांचे 'अर्थपूर्ण' गुऱ्हाळ रंगत असल्याने

♦ कचऱ्याच्या कोट्यावधीच्या ठेक्यासाठी हालचाली

अकोल्याच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात तीव्र खळबळ उडाली आहे.
मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार, अकोला मनपाच्या कचरा ठेक्याची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून मंगळवारपर्यंत हा कोट्यावधींचा ठेका फायनल होण्याची शक्यता आहे. मात्र, हा निर्णय होण्यापूर्वीच प्रशासकीय पातळीवर प्रचंड गुप्त हालचालींना वेग आला आहे. आयुक्त सुट्टीवर असतानाही त्यांच्या बंगल्याचे दरवाजे कोणासाठी उघडले गेले ? तिथे कोणासाठी पायघड्या घातल्या गेल्या ? आणि आयुक्तांच्या अनुपस्थितीत या बंगल्याला चर्चेचा अड्डा कोणी बनवला ? असे अनेक गंभीर प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत. अकोल्यातील एका हॉटेल मध्ये उतरलेल्या या नागपूरच्या ठेकेदाराने सकाळी अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याची माहिती आहे. अधिकाऱ्यांना हाताशी धरून फिल्डिंग लावणारा तो नागपूरचा बडा कंत्राटदार नेमका कोण ? याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे. या संपूर्ण प्रकरणातील कोट्यवधींच्या 'लपवाछपवी'मुळे पारदर्शकतेचा पुरता बोजवारा उडाला असून, मंगळवारी होणाऱ्या निविदा अंतिम प्रक्रियेकडे आता सर्वांचे डोळे लागले आहेत.

मुंबईचे ठेकेदार राहिले गाफिल
♦ या कोट्यवधींच्या संयुक्त ठेक्यासाठी मुंबईच्या नामांकित कंपन्यांनीही रस दाखवला होता. मात्र, या कंपन्यांना पूर्णपणे गाफील ठेवून, नागपूरच्या एका विशिष्ट कंत्राटदाराला 'धोबीपछाड' देण्यासाठी मनपाच्या अधिकाऱ्यांनी पडद्यामागून जोरदार सूत्रे हलवली आहेत. नागपूरच्या या 'खास मित्रासाठी' अधिकाऱ्यांनी इतकी चोख तयारी केली आहे की, हा ठेका आधीच 'फिक्स' झाल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे.

# जातनिहाय जनगणनेसाठी ओबीसी आरक्षण परिषदेचा एल्गार!

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिले धरणे: शेकडो ओबीसी बांधवांची उपस्थिती

प्रतिनिधी दि. २ जूलै

**अकोला :** ओबीसींची जातनिहाय जनगणना करा, मराठा समाजाला दिलेल्या ओबीसी प्रमाणपत्रांची फेरतपासणी करण्यात यावी, यासह अन्य मागण्यांसाठी ओबीसी आरक्षण हक्क समितीने बुधवार,१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.

दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांना या संदर्भात निवेदन देखील देण्यात आले.आरक्षण जनगणना उपसमिती बरखास्त करण्याची मागणी यामधून करण्यात आली. ओबीसींच्या आरक्षणासह अन्य मागण्यांसाठी विविधस्तरांवर बैठका, सभा सुरु आहेत. काही दिवसांपूर्वी ओबीसी जनमोर्चाची राज्यस्तरीय बैठक पार पडली होती. ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही



पदाधिकाऱ्यांनी दिला होता. दरम्यान याच अनुषंगाने १ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. ओबीसी अधिकार हक्क व संरक्षण परिषदेतर्फे विविध मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनात अखिल भारतीय सावता परिषदेचे कल्याणकाका आखाडे, माजी आमदार नारायण गव्हाणकर, धोबी समाज आरक्षण कृती समितीचे अनिल शिंदे, माजी आमदार हरिभाऊ भदे, प्रा. डॉ. संतोष हुशे, प्रवीण वाघमारे, लक्ष्मण निखाडे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे, महेश गणगणे यांनी संबोधित केले. आंदोलनात ओबीसी जनमोर्चाचे जिल्हाध्यक्ष अतुल नवात्रे, प्रतिभा अवचार, माया ईरतकर, माजी जि प अध्यक्षा संध्या वाघोडे, विष्णू मेहरे, जनार्दन हिरळकर, रामदास गाडेकर, पुष्पा गुलवाडे, शंकरराव इंगळे, सदाशिव शेळके, ज्योती निखाडे, नंदू बोपुलवार, विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनात अ. भा. कुणबी समाज मंडळ, बारा बलुतेदार महासंघ, अ. भा समता परिषद, अ. भा. सावता परिषद, धनगर समाज मंडळ, माळी महासंघ, ओबीसी जनमोर्चा आदी संघटना सहभागी झाल्या.

# रेल्वे स्टेशनजवळ हमसफर बसमध्ये प्रवाशाला बेदम मारहाण

प्रतिनिधी दि. 2 जूलै

**अकोला:** रेल्वे स्टेशन जवळ बस क्रमांक MH27-A-9994 मधील प्रवाशाला बेदम मारहाण करण्यात आली अशी माहिती आहे. 30 जून रोजी रात्री 8.30 वाजता खासगी बस मध्ये हा प्रकार घडला.

प्रवाशाला हात-पायांनी बेदम मारहाण करत अश्लील शिव्या दिल्या. मारहाणीत प्रवाशाच्या चेहऱ्याची हाडे तुटली आणि तो बेशुद्ध झाला. मारहाण केल्यानंतर बस कर्मचाऱ्यांनी बेशुद्ध प्रवाशाला गाडीतून खाली फेकले. नंतर बस फतेह चौकाकडे निघून गेली.

बस संचालक "आरटीओला खिशात घालून फिरतो" अशी धमकी देत असल्याचे प्रवासी सांगतात.व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, तरीही कोणतीही कारवाई नाही.

आतापर्यंत पोलिस किंवा परिवहन विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.या घटनेमुळे अकोला शहरातील प्रवासी वर्गामध्ये प्रचंड संताप उसळला आहे. पोलिस प्रशासन व आरटीओने या बसवर तातडीने कारवाई करून दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# संभाजी ब्रिगेडच्या पुढाकाराने गणेश घाटमधील टाक्यांची स्वच्छता

प्रतिनिधी दि. 2 जूलै

**अकोला :** मोर्णा नदीच्या काठी गणपती विसर्जन करण्यासाठी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने सात टाक्यांचे बांधकाम केले आहे. टाक्यांची पाहणी केली तेव्हा गणपतीच्या भंगलेल्या शेकडो मुर्त्या तसेच

रिकाम्या बाटल्या दिसल्या. संभाजी ब्रिगेडच्या प्रयत्नातून टाक्यांची स्वच्छता करण्यात आली. महानगर अध्यक्ष देवा गावंडे, ऋषभ काळे शहर सचिव यांनी महानगर पालिकेच्या आरोग्य निरीक्षक, अभियंता अजय गुजर यांना माहिती दिली. अजय गुजर अभियंता यांनी कर्मचाऱ्यांना गणेश घाटावर



पाठवले. आरोग्य निरीक्षक, क्षेत्रीय झोन अधिकारी यांच्याशी फोनवर चर्चा करून सदर टाक्यातील गणपतीच्या मुर्त्या ट्रॅक्टरमध्ये भरून बाळापूरच्या नदीत विसर्जन करण्याचे आश्वासन प्रशासनाने संभाजी बिग्रेडला दिले. यावेळी देवा अडीलकर उपस्थित होते. आज अकोला महानगरपालिकेने संभाजी ब्रिगेडच्या तक्रारीची दखल घेऊन गणेश घाट टाक्याची स्वच्छता मोहीम सुरू केली.

# हिवरखेड पोलिस ॲक्शन मोडवर

प्रतिनिधी दि. 2 जूलै

हिवरखेड : पोलिस ॲक्शन मोडवर आल्याचे चित्र गावात विविध धाडीवरून दिसून येत आहे. गावातील स्थानिक एका धाब्यावर पोलिसांनी धाड टाकून विदेशी दारू जप्त केली, तर पाणीपुरवठा विभागात सुरू असलेल्या चिल्लर जुगारावर धाड टाकली तर वरली मटक्यार सुद्धा कारवाई केली, पोलिसांच्या या सिंघम स्टाईलने अवैध धंदेवाईकांचे धाबे दणाणले आहेत, पोलिसांच्या या भूमिकेने गावात शांतीमय वातावर दिसत असल्याने सुज्ञ नागरिक पोलिसांचे शाब्दिक कौतुक करीत आहेत.

# शाळेच्या पहिल्याच दिवशी जि.प.शाळा भातकुलीला सुनील राणा यांची सदिच्छा भेट

## गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन

प्रतिनिधी दि. २ जूलै

**अमरावती :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा आणि त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने भातकुली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला शाळेच्या पहिल्याच दिवशी सुनील राणा यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून मन लावून शिक्षण घेण्याचे आवाहन केले. शिक्षण हेच उज्वल भविष्य



घडविण्याचे प्रभावी माध्यम असून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या ध्येयपूर्तीसाठी सातत्याने परिश्रम घ्यावेत, असे मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार आणि सामाजिक जाणीव रुजविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेच्या परिसरात आनंदी आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांनीही नव्या शैक्षणिक वर्षाची उत्साहाने सुरुवात केली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या तसेच शिक्षण क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने सहकार्य करण्याची ग्वाही उपस्थित मान्यवरांनी दिली.या कार्यक्रमाला नगर पंचायत भातकुली नगराध्यक्षा योगीता कोलटके, उपाध्यक्ष प्रतीक कांडलकर, युवा स्वाभिमान पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष संजय चुनकीकर, राजू चुनकीकर, हर्षद वाचासुंदर, शंकर डोंगरे, पुरुषोत्तम खर्चान, दिपाली गावंडे, अर्चना ठोंबरे, संजय सोळंके, राजु तेलमोरे, रवि गावंडे, गिरीष कासट यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# अकोटमध्ये 3 जुलैला 'प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस' साजरा होणार

## धारिणी फाऊंडेशन चा पुढाकार

प्रतिनिधी दि. २ जूलै

**अकोट :** शहरातील पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या धारिणी फाऊंडेशन, अकोट यांच्या वतीने गुरुवार ३ जुलै २०२६ रोजी सकाळी ९ वाजता शिवाजी चौक येथे 'प्लास्टिक पिशवी मुक्त दिवस' साजरा करण्यात येणार आहे.

'चला, प्लास्टिकला नकार देऊया! पर्यावरण वाचवूया, भविष्य सुरक्षित बनवूया!' या घोषवाक्या सह हा जनजागृती कार्यक्रम होणार आहे. शहरातील प्लास्टिक पिशव्यांचा वापर थांबवून अकोट शहर सुंदर व स्वच्छ बनवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या कार्यक्रमासाठी सर्व नागरिक, विद्यार्थी, महिला, व्यावसायिक व पर्यावरणप्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक धारिणी फाऊंडेशनने केले आहे. कार्यक्रमादरम्यान प्लास्टिकच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती केली जाणार असून, कापडी पिशव्यांच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

# श्रींच्या पादुकांचे पुजन व शिवलिंग दर्शन भेट सोहळा

प्रतिनिधी दि. २ जूलै

**अकोट :** औंढा नागनाथ येथील ज्योतिर्लिंग मंदिराच्या गाभाऱ्यात तालुक्यातील योग योगेश्वर संस्थान मधील श्रींच्या पादुकांचे पुजन व शिवलिंग दर्शन भेट सोहळा बुधवारी पार पडला. योग योगेश्वर संस्थान संत गजानन महाराज मंदिर येथून महाक्षेत्र पंढरपूरकडे निघालेली पायी दिंडी व पालखी मार्गस्थ झाली आहे.



हिंगोली जिल्ह्यात पालखी पोहचल्यावर औंढा नागनाथ येथील प्राचीन शिव मंदिरात हभप गणेश महाराज शेटे यांनी पायदळ वारी दिंडीत पालखीत असलेल्या श्रींच्या पादुका घेऊन १२ ज्योतिर्लिंगापैकी आठवे ज्योतिर्लिंगाचा जलाभिषेक,दर्शन सोहळा व पुजन केले. याप्रसंगी औंढा नागनाथ संस्थाने विशेष सहकार्य केले. या ठिकाणी दर्शन सोहळ्यानंतर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडला. अकोट तालुक्यातून यंदाच्या आषाढी वारीसाठी रवाना झालेली ही पहिली पायदळ वारकरी दिंडी असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. दिंडी चालक हभप अवधूत महाराज पारस्कर यांच्या उपस्थितीत पालखीने विसावा घेतल्यानंतर कीर्तनाने भक्तिरसाचा वर्षाव झाला.

# गोरक्षण नगरातील पाणीटंचाईबाबत माजी नगराध्यक्षांचे जलपुरवठा मंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी दि. २ जूलै

**मुर्तिजापूर :** शहरातील गौरक्षण नगर परिसरातील पाणीपुरवठा व पाणी टाकीशी संबंधित विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी माजी नगराध्यक्ष द्वारकप्रसाद दुबे यांनी महाराष्ट्र राज्याचे जलपुरवठा मंत्री यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गौरक्षण नगर येथील पाण्याची टाकी सन २००० मध्ये उभारण्यात आली असून गेल्या अनेक वर्षांपासून तिचा वापर सुरू आहे. मात्र, टाकीची नियमित स्वच्छता व देखभाल होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. टाकी परिसरात मोठ्या प्रमाणात घाण साचलेली असून काही ठिकाणी पाण्याची नासाडी होत असल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे टाकीची तात्काळ स्वच्छता करून परिसर स्वच्छ ठेवण्यासह नियमित देखभाल करण्याची मागणी करण्यात आली आहे. गौरक्षण नगरातील अनेक भागांमध्ये पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नवीन पाईपलाईन टाकणे, पाणीपुरवठा व्यवस्था सुरळीत करणे तसेच आवश्यक ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणीही करण्यात आली आहे. माजी नगराध्यक्ष वारकप्रसाद दुबे यांनी संबंधित विभागाने त्वरित दखल घेऊन नागरिकांना स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांसह आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# सिंचन प्रकल्पांतील जलस्तरात काहीही वाढ नाही

## दमदार पावसाची सर्वांना प्रतीक्षा

प्रतिनिधी दि. २ जूलै

अकोला : जून संपला तरी अद्याप दमदार पाऊस झाला नाही. त्यामुळे सिंचन प्रकल्पातील जलस्तरात किंचितही वाढ झाली नाही. उलट जलसाठ्याला ओहोटी लागली असून, उमा मध्यम प्रकल्पातील जलसाठा तळ गाठण्याकडे आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा १९.४८ तर वान प्रकल्पात ४०.६७ टक्के जलसाठा उरला आहे.
ही बाब भयावह स्थिती निर्माण करणारी असून, येत्या १५ दिवसांत वाशिम जिल्ह्यातील मालेगाव परिसरात काही दिवसात जोरदार पाऊस झाला नाही तर अकोलेकरांवर पिण्याच्या पाण्याचे संकट येऊ शकते. गतवर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे जिल्ह्यातील मोठे व मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो झाले होते. या साठ्यामुळे रब्बी हंगामही साधला गेला. सर्वच प्रकल्पांतून रब्बीतील पिकांचे सिंचन होऊ शकले. दरवर्षी जूनच्या मध्यान्हानंतर पावसाला सुरुवात होऊन प्रकल्पात जलसाठा वाढतो. परंतु, यावर्षी जून संपला असला तरी पावसाची कृपादृष्टी झाली नाही. त्यामुळे सिंचन प्रकल्पातील



# पाण्यावरून वाद; माय-लेकावर चाकूने हल्ला!

प्रतिनिधी दि. २ जूलै

मलकापूर: नालीच्या पाण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एक ५८ वर्षीय महिला आणि तिच्या मुलाला मारहाण केल्याची घटना मलकापूर तालुक्यातील घिर्णी येथे घडली. याप्रकरणी ३० जून रोजी रात्री मलकापूर शहर पोलिसांनी एकाच कुटुंबातील पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ७ मे रोजी सकाळी याच कारणावरून संशयित आरोपी विनोद लक्ष्मण वाघमारे, यशोदा लक्ष्मण वाघमारे आणि लक्ष्मण निनाजी वाघमारे यांनी फिर्यादीशी वाद घालून त्यांना व त्यांच्या मुलाला मारहाण केल्याचा आरोप आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला- ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135